अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ७ जून २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : २४८ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने १२


## उपप्रादेशिक परिवहन अधिकारीपदी गजानन नेरपगार

### अर्चना पाटील यांची बदली

✔ **दक्षिण सोलापूर** : सोलापूर येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना पाटील यांची बदली झाली असून त्यांच्या जागी धाराशिव येथील गजानन नेरपगार यांची सोलापूरच्या उपप्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणून पदोन्नतीने नियुक्ती झाली आहे.

याबाबतचा आदेश परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी काढले आहेत. धाराशिव उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पदाचा पदभार विजय तानाजी पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. याशिवाय लातूर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पदाचा कार्यभार अशिषकुमार अय्यर यांच्याकडे पुढील आदेश होईपर्यंत अतिरिक्त स्वरूपात सोपविण्यात आला आहे.



विजय पाटील यांनी स्वतःच्या पदाची कर्तव्य सांभाळून गजानन नेरपगार यांच्याकडून प्रादेशिक परिवहन अधिकारी व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, धाराशिव पदाचे काम काज सांभाळावे. सोबतच अशिषकुमार अय्यर यांनी लातूर येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पदाचे कामकाज सांभाळावे असेही परिपत्रकाव्दारे सुचित करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर आरटीओ विभागात बदल्या सुरू झाल्या आहे. लोकसभा निवडणुकीनंतर आरटीओ विभागात बदल्या सुरू झाल्या असून अन्यही अधिकारी बदलीच्या प्रतिक्षेत असल्याचे बोलले जात आहे.

# उध्दव ठाकरेंना एनडीएत आणण्याचे प्रयत्न

**महाराष्ट्रात उलथापालथ**

**दोन्ही शिवसेनेच्या एकत्रीकरणाचा प्रयत्न**

✔ नवी दिल्ली, मुंबई/विशेष प्रतिनिधी

**केंद्रात स्थीर सरकार देण्यासाठी ३२० सदस्यांचा पाठींबा मिळवण्याचे भारतीय जनता पक्षाचे प्रयत्न सुरू असून त्यासाठी उध्दव ठाकरे यांना एनडीएसोबत घेण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महत्त्वची भूमिका बजावत आहे. त्यानुसार सत्तेत वाटा आणि सन्मानजनक वागणूकीची हमी याच बरोबर दोन्ही शिवसेना एकत्र आणून विधानसभा ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली लढण्याची ऑफर शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्यासमोर ठेवण्यात आली असून त्यावर ठाकरेंकडून गांभीर्याने विचार सुरू केले असल्याचे विश्वासनीय सूत्रांकडून समजते.**



ठाम मित्रांना जोडण्याच्या भाजपच्या भूमिकेनुसार शिवसेनेला एनडीएत आणण्याच्या हालचालींना वेग आला आहे. त्यासाठी शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांना एनडीएत आणण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. एका केंद्रीय मंत्र्यावर त्याची जबाबदारी सोपवण्यात आली असून प्रसंगी दोन्ही शिवसेनेचे मनोमिलन घडवून पुन्हा एकसंध शिवसेना भाजपबरोबर आणण्याच्या हालचालींनी वेग घेतल्याचे पक्षातील विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

संघाच्या परिवाराने याबाबत मध्यस्थीची भूमिका स्वीकारली आहे. त्यांनी ठाकरे यांच्याशी संपर्क साधला आहे. भारतीय जनता पक्षाशी संबंध तुटले तरी ठाकरे यांचे संघ नेतृत्वाशी संबंध तुटले नाहीत. संघ परिवाराने तडजोड करून शिवसेनेला सोबत घ्यावे असेच मत वेळोवेळी व्यक्त केले होते. त्यामुळे पुन्हा एकदा शिवसेनेला सोबत घेण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले.

भाजपकडून देण्यात आलेल्या प्रस्तावानुसार, केंद्रात उध्दव ठाकरे यांना महत्त्वाचे खाते देत मंत्रीपद देण्यात येणार आहे. त्यानंतर दोन्ही शिवसेनेचे एकत्रीकरण करत शिवसेना भाजपा युतीच्या वतीने एकत्रित विधानसभा लढवण्यात येईल. त्याचे नेतृत्व उध्दव टाकरे यांच्याकडे देण्यात येईल. दरम्यान, इंडिया आघाडीच्या बैठकीला उध्दव ठाकरे अनुपस्थित राहिल्याने ते एनडीए सोबत जाणार असल्याची चर्चा सुरू झाली होती.

दरम्यान, शिवसेनेचे नेते खासदार संजय राऊत यांनी या सर्व चर्चा फेटाळल्या आहेत. मात्र तरीही या उध्दव ठाकरे यांच्या यांनी या बाबत स्त:हून कोणतेही स्पष्टीकरण न दिल्याने त्याबाबतची संदिग्धता निर्माण झाली आहे. ठाकरे गटाचे राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी सांगितले की, आतापर्यंत अशी कोणतीही चर्चा झालेली नाही. आम्ही आधी सांगितले आहे की पीएम मोदींकडे बहुमत आहे, जवळपास २४० जागा त्यांच्याकडे आहेत. म्हणून त्यांनी शपथविधी करून घ्यावा. त्यांनी तिसऱ्यांदा शपथ घ्यावी. मग चौथ्या शपथेबद्दल आम्ही विचार करू.

### अमित शहा मातोश्रीवर येणार

शिवसेना एनडीएत यावी म्हणून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मातोश्रवर येऊन प्रस्ताव देणार आहेत. या साऱ्या प्रकियेपासून देवेंद्र फडणवीस यांना दूर ठेवण्यात येत आहे. भाजपा आणि शिवसेनेत मनभेद होण्यास फडणवीस हेच कारणीभूत असल्याचे शिर्षस्थ नेत्यांचे मत आहे. त्यामुळे फडणवीस यांना या साऱ्या वाटाघाटीपासून दूर ठेवण्यात येणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.



### कारण शोधलं जातंय

इंडिया आघाडीतून बाहेर पडण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांना सबळ कारण हवे आहे. ते मिळाले की इंडिया आघाडी सोडून ते एनडीएत सहभागी होणार आहेत. त्यासाठी आवश्यक ती नेपथ्य योजना भाजप करत असल्याची माहिती आहे.

### ठाकरे यांच्या निकटवर्तीयाकडून दुजोरा

उध्दव ठाकरे यांना एनडीए घेण्याचा प्रस्ताव आला आहे. उध्दव ठाकरे त्याही प्रस्तावावर विचार करत आहेत. लोकसभा निवडणुकांत उध्दव आणि आदित्य ठाकरे यांनी सर्वाधिक परिश्रम घेतले मात्र, त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. त्याचा सर्वाधिक फायदा काँग्रेसला झाला. त्यामुळे एनडीएत गेल्यास आपली कडव्या हिंदुत्ववादी मतांची व्होट बँक आपल्याला मिळवता येईल, असाही सल्ला उध्दव ठाकरे यांना देण्यात आल्याचे समजते.

### फडणवीस पक्ष संघटनेत

अगामी विधानसभा निवडणूक उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली लढवण्याची तयारीही भारतीय जनता पक्षाने केली आहे. त्यात अडसर होऊ नये म्हणून फडणवीस यांना पक्षसंघटनेत जबाबदारी देणार असल्याचे पक्षाच्या दिल्लीतील अतीवरीष्ठ सूत्रांनी सांगितले.

**■ प्रवक्त्यांकडून नकार**

# सुरू झाला घोडेबाजार शहा, मोदी झाले बेजार

✔ **नवी दिल्ली** : राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बुधवारी झालेल्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आघाडीच्या नेतेपदी निवड करण्यात आली. मात्र आपल्या राज्यांसाठी सवलती आणि महत्त्वाची खाती मागत वाटाघाटींच्या पर्वाला सुरवात केली आहे. या पर्वाची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिलकूल सवय नाही.



या बैठकीनंर भाजपाने काढलेल्या पत्रकात, सहयोगी पक्षांनी मोदी यांचे नेतृत्व एकमुखी मान्य केले आहे. त्यांचे राष्ट्र निर्माणासाठी कठोर परिश्रम आणि प्रयत्नाची सर्वांनी प्रशंसा केली, असे त्यात म्हटले आहे. मोदी हे शनिवारी पंतप्रधानपदाची तिसऱ्यांदा शपथ घेण्यास सज्ज आहेत. मात्र, तेलगू देसम आणि जनता दल संयुक्त यांनी मोठा घोडेबाजार मांडला असल्याचे भाजपमधील सूत्रांनी सांगितले. त्यामुळे मोसी ३.० पुढे सवय नसलेला मोठा दबाव आहे. देसम बॉस चंद्राबाबू नायडू या आघाडी सरकारसाठी सुरु असणाऱ्या घोडेजारात आपली किंमत पुरेपूर वसूल करत आहेत. त्यांना लोकसभेच्या अध्यक्षपदासोबत आपल्या आंध्र प्रदेश या राज्याला विशेष दर्जा द्यायचा आहे. या शिवाय गेल्या सरकारमध्ये अमित शहा आणि राजनाथसिंह भुषवत असलेल्या गृह आणि संरक्षण खात्यावरही नायडू यांनी दावा सांगितला आहे.

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही आपल्या राज्यासाठी अशाच स्वरूपाची म्हणजे मागास राज्य जाहीर करण्याची मागणी केली आहे. यावेळे सारखी संधी यापुर्वी कधीही नव्हती, याची त्यांना पुरेपूर जाणीव आहे. या शिवाय देशव्यापी जातनिहाय जनगणना करावी अशीही नितीशकुमारर यांची मागणी आहे, असे जनता दलाच्या एका नेत्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. देसमचे १६ आणि जनता दलाचे १२ खासदार भाजपसाठी खूप महत्त्वाचे आहेत. २७२ चा जादुई आकडा असणाऱ्या संसदेत भाजपाचे २३९ सदस्य आहेत. देसम लोकसभा अध्यक्षांच्या मागणीवर ठाम आहे कारण स्वबळाबर बहुमत मिळवण्यासाठी भाजपाची पक्ष फोडण्याच्या रणनितीची त्यांना पुरेपूर कल्पना आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपुर्वी देसमच्या राज्यसभेतील सहा सदस्यांनी भाजपत प्रवेश केला होता. त्याची जाणीव देसमला आहे. भाजप त्यांच्या पाठींब्यावर अवलंबून असल्याने २०१४ मध्ये मोदी सरकारमध्ये एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्री पद असणाऱ्या देसमला आता आपला वाटा वाढवून हवा आहे. तो मिळवायची हीच वेळ आहे, याची त्यांना जाणीव असल्याचे देसम मधील सुत्रांनी सांगितले. कृषी आणि ग्रामविकासाचे महत्त्वाचे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी नितीश कुमारांना ती खाती हवी आहेत. चिराग पास्वान यांचे पाच खासदार आहेत. त्यांना वडील रामविलास पासवान यांनी दिर्घकाळ भूषवलेले रेल्वे खाते हवे आहे.




### या नेत्यांवर जबाबदारी

भाजपा नेतृत्वाने राजनाथसिंह आणि पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासारख्या तुलनेने सोबर नेत्यांवर वाटाघाटींची प्राथमिक जबाबदारी सोपवली आहे.

**प्रशासकीय कामात निष्काळजीपणा प्रकरणी**

# क्रीडा अधिकारी घोलपांना कारणे दाखवा नोटीस

✔ सुराज्य/सोलापूर

प्रशासकीय कामात निष्काळजीपणा प्रकरणी महापालिकेचे क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी नोटीस बजावली आहे.

सोलापूर शहरातील पार्क स्टेडियम जवळील वीर सावरकर जलतरण तलावात युवक प्रवीण शिवानंद बहिरमठ (वय २२, रा. भवानी पेठ, रुपा भवानी मंदिराजवळ, सोलापूर) याचा बुडून मृत्यू झाला.

दरम्यान, महापालिका क्रिडा अधिकारी श्रीकांत घोलप यांनी याप्रकरणी वरिष्ठ नियंत्रण अधिकारी यांना वेळोवेळी माहिती देणे आवश्यक होते. याप्रकरणी पोलिसात काय नोंद झाली ? संबंधित जलतरण तलावामध्ये नेमके काय घडले ? या संदर्भात माहिती घेऊन कळवणे गरजेचे होते. त्यामुळे प्रशासकीय कामात निष्काळजीपणा प्रकरणी महापालिका क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप यांना महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. येत्या सात दिवसात याबाबत क्रीडा अधिकाऱ्यांनी उत्तर देण्याचे नोटीसद्वारे स्पष्ट केले आहे.



# पाच लाखांच्या १५ मोटार सायकली हस्तगत

**मोटार सायकल अटल चोरटा जेरबंद; गुन्हेशाखेची कामगिरी**

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हातील मोटार सायकल चोरीचे गुन्हे वाढत असल्याने पोलीस अधीक्षक, व अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी मोटार सायकल चोरी करणारे आरोपींचे शोध घेवुन गुन्हे उघड करणेबाबत पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, यांना आदेशीत केले होते. सदर आदेशाच्या अनुषंगाने सुरेश निंबाळकर स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडील पोउपनि सुबोध जमदाडे, व पथकातील पोउपनि रविराज कांबळे, अंमलदार यांना गुन्हे उघड करणेबाबत व रेकॉर्डवरील गुन्हेगार यांचे शोध घेणेकामी आदेशीत केले.



पोउपनि सुबोध जमदाडे, व पथकातील पोउपनि रविराज कांबळे, अंमलदार हे पंढरपूर उपविभागात मालाविषयी गुन्हयाचे तपासाकामी पेट्रोलिग करीत असताना, पोहेकॉ रवि माने यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, कुर्डुवाडी पोलीस ठाणे गुरनं ३०/२०२४ भादवि क ३७९ या गुन्हयातील चोरीस गेलीली मोटार सायकलवर एक इसम तिन रस्ता चौक, पंढरपूर येथे चोरलेली मोटार सायकल विक्रीसाठी येणार आहे. तसेच तो अंगाने जाड त्याचे अंगावर नेसनीस फिकट गुलाबी रंगाचे शर्ट व काळपट रंगाची पॅन्ट घातलेला आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळल्याने.

सदर बातमी प्रमाणे पोउपनि सुबोध जमदाडे, व पथकातील पोउपनि रविराज कांबळे, अंमलदार नमुद बातमीच्या ठिकाणी सापळा रचुन नमुद वर्णनाच्या इसम मोटार सायकलवरुन येताच त्यास ताब्यात घेतले. नमुद इसमासकडे अधीक विश्वासात घेवुन याच्या ताब्यातील मोटार सायकल बाबत विचारपुस करता सदर मोटार सायकल त्याने कुर्डुवाडी येथुन चोरी केल्याची कबुली दिली. तसेच आरोपीतास अधीक विश्वासात घेवुन सखोल तपास करता त्याने सोलापूर, अहमदनगर, पुणे, धाराशीव व कोल्हापूर येथुन चोरलेले एकुण १४ मोटार सायकली त्याचे घराच्या पाठीमागील पडक्या जागेवर लपवुन ठेवलेले मोटार सायकली हस्तगत करण्यात आले आहे. मोटार सायकल चोरीचे गुन्हे अभीलेख पडताळनी केली असता, पोलीस ठाणेस मोटार सायकली चोरी गेलेचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. तसेच अ. क्रं ९ ते १४ बाबत गुन्हे अभीलेख पाहता काही एक गुन्हे अभीलेख मिळुन आले नाही. पुढील तपास कुर्डुवाडी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

वरील अ. क्रं ९ ते १४ मोटार सायकली बाबत अधीक माहिती प्राप्त झाल्यास कुर्डुवाडी पोलीस ठाणे यांना कळविण्यात यावे. नमुद उल्लेखनीय कामगिरी शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली सुरेश निंबाळकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली, व सहा. पोलीस निरीक्षक, नागनाथ खुणे यांचे मदतीने पोलीस उप-निरीक्षक सुबोध जमदाडे, व पथकातील पोलीस उप-निरीक्षक रविराज कांबळे, सपोफौ श्रीकांत गायकवाड, मंहमद इसाक मुजावर,पोहेकॉ सलीम बागवान, विजयकुमार भरले, रवि माने, पोना धनराज गायकवाड, पोकॉ अनवर अत्तार, सुरज रामगुडे, विनायक घोरपडे, बुरकुल यांनी बाजवली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आमच्यापेक्षा त्यांना जास्त टेन्शन आहे !

| कल्याण |
| --- |
| 113-53-599 |

| मुंबई |
| --- |
| 238-32-200 |

# प्रत्येकवेळी नवा खासदार; माढ्याचे समीकरण कायम

**● चारहीवेळा नवीन चेहरा; आता सोलापूरकरांच्या गळ्यात माळ**

✔ सुराज्य/सोलापूर

**माढा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक चुरशीची होऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे धैर्यशील मोहिते–पाटील भाजपवर भारी ठरले. त्यांनी खासदार रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांच्यावर मात केली. त्यामुळे प्रत्येकवेळी नवा खासदार हे माढ्याचे समीकरण कायम राहिले. तर यावेळी सोलापूरकरांच्या गळ्यात विजयाची माळ पडली असली तरी यापूर्वी पुणे आणि सातारकरही माढ्यातून खासदार झाले आहेत.**

देशात २००८ मध्ये लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना झाली. त्यावेळी माढा मतदारसंघ अस्तित्वात आला. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील माढा, सांगोला, करमाळा आणि माळशिरस विधानसभेचे मतदारसंघ येतात. तर सातारा जिल्ह्यातील माण आणि फलटण



विधानसभा मतदारसंघांचाही समावेश होतो. २००९ मध्ये लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक झाली. या पहिल्या निवडणुकित राष्ट्रवादीकडून पक्षाध्यक्ष शरद पवार यांना माढ्याची निवडणूक लढविण्याचा आग्रह झाला. त्यामुळे पवार माढ्यातून रिंगणात उतरले. तर विरोधात भाजपचे सुभाष देशमुख तसेच रासपचे महादेव जानकरही रिंगणात होते. त्यावेळी माढा मतदारसंघात राष्ट्रवादीचे वर्चस्व होते. त्या तुलनेत भाजपची ताकद नगण्य होती. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे शरद पवार यांनी तब्बल ३ लाखांहून अधिक मतांनी भाजपचा पराभव केला. पवार हे पुणे जिल्ह्यातील असले तरी माढ्याचे पहिले खासदार ठरले.

२०१४ च्या निवडणुकीत माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांना राष्ट्रवादीने मैदानात उतरवले. त्यावेळी राज्यात महायुती झाली होती. स्वाभिमानी शेतकरी संघटना महायुतीचा भाग होती. मतदारसंघ स्वाभिमानीला गेल्यावर सदाभाऊ खोत यांना उमेदवारी मिळाली. या निवडणुकीत खोत यांनी जोरदार टक्कर दिली. पण त्यांचा मोहिते-पाटील यांनी २५ हजार मतांनी पराभव केला. मोहिते-पाटील दुसरे खासदार ठरले. ते सोलापूर जिल्ह्यातील अकलुजचे. २०१९ ला तिसरी निवडणूक झाली. भाजपने रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना, तर राष्ट्रवादीने करमाळ्याचे आमदार संजय शिंदे यांना उमेदवारी दिली. पहिल्यांदाच मतदारसंघात रणजितसिंह यांच्या रूपाने कमळ फुलले. त्यांनी शिंदे यांचा ८५ हजार मतांनी पराभव केला. रणजितसिंह हे सातारा जिल्ह्यातील फलटणचे. त्यामुळे माढ्याचा खासदार तीन निवडणुकात वेगवेगळा झाला. मोहिते यांच्यामुळे माढ्यात रणजितसिंह यांना दुसऱ्यांदा खासदार बनता आले नाही. तसेच माढा मतदारसंघाने प्रत्येकवेळी नवीन खासदार निवडून देण्याची परंपराही कायम ठेवली.

### नेहमीच नवा उमेदवार

माढा मतदारसंघातील चौथी निवडणूकही राष्ट्रवादी आणि भाजपमध्येच झाली. आतापर्यंतच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रत्येकवेळी नवीन उमेदवार देण्यात आला आहे. यामध्ये अकलुजच्या मोहिते-पाटील घराण्यात दुसऱ्यांदा उमेदवारी मिळाली आहे. तर भाजप तसेच युतीतून पहिल्या दोन निवडणुकांत वेगवेगळे उमेदवार देण्यात आले. तर तिसऱ्या निवडणुकीत विजयी झालेले खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यावर भाजपने आताच्या चौथ्या निवडणुकीतही विश्वास दाखविला. पण, आताच्या या निवडणुकीत राजकीय समीकरणे खूप बदलली. त्यामुळे भाजपला पराभवाचा सामना करावा लागला. रणजितसिंह यांच्या उमेदवारीला विरोध होत असताना भाजपने विचार केला असता तर या निवडणुकीतील चित्र वेगळेच असते.